# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

प्रेसनोट

## पीएमपीएमएल च्या संपूर्ण संचलन क्षेत्रासाठी दैनिक व मासिक पास सुविधा सुरू

पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांसह पी.एम.आर.डी.ए. हद्दीत बससेवा पुरविण्यात येते. सध्या एका मनपा हद्दीसाठी दैनिक पास रूपये ४० व मासिक पास रूपये ९०० तर दोन्ही मनपा हद्दीसाठी दैनिक पास रूपये ५० व मासिक पास रूपये १२०० असे पास वितरीत करण्यात येत असून सदरची सुविधा सुरूच राहणार आहे. या व्यतिरिक्त पीएमपीएमएलच्या संपूर्ण संचलन क्षेत्राकरीता दैनिक पास रू. १२० व मासिक पास रू. २७०० अशी पास सुविधा नव्याने सुरू करण्यात येत आहे.

पी.एम.आर.डी.ए. संचलन क्षेत्रातील नोकरदार, महिला व लोकप्रतिनिधी यांनी पी.एम.आर.डी.ए. हद्दीतील प्रवाशांकरीता पूर्वीच्या संपूर्ण संचलन क्षेत्रासाठी असलेल्या पासच्या दरात काही प्रमाणात दरवाढ करून पूर्वीप्रमाणेच दैनिक पास व मासिक पास सुरू करणेबाबत वारंवार पत्रव्यवहार करून मागणी केलेली आहे.

त्यास अनुसरून पीएमपीएमएलच्या संपूर्ण संचलन क्षेत्राकरीता दैनिक पास रू. १२० व मासिक पास रू. २७०० सुरू करणेस मा. संचालक मंडळाचे बैठकीत निर्णय झालेला आहे.

सदरचे मासिक पाससाठी प्रवाशांनी परिवहन महामंडळाचे नजीकचे पास केंद्रावर जाऊन आधार कार्डची झेरॉक्स प्रत व फोटो देऊन प्रवाशी ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. तसेच दैनिक पाससाठी आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट इत्यादी पैकी कोणतेही एक ओळखपत्र बसमधील वाहकाला दाखवून वाहकाकडून दैनिक पास घेता येईल. सदरील पास सुविधा दि. ०४/०९/२०२३ पासून सुरू करण्यात येत आहे.

तरी जास्तीत जास्त प्रवाशी नागरिकांनी या संपूर्ण संचलन क्षेत्राकरीता सुरू करण्यात येत असलेल्या दैनिक व मासिक पास सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. ०२/०९/२०२३

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.